# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

(क) सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला **श्री.हेमंत पाटील** यांचा "**राज्यातील शेतकऱ्यांच्या शासकीय थकबाकीपोटी शासन जमा झालेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याबाबत**" या विषयावरील **तारांकित प्रश्न क्रमांक ९९६**.

(ख) सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.अभिजित वंजारी व इतर वि.प.स. यांचा "**गोंदिया जिल्ह्यातील केंद्रीय विद्यालयाला एकाच ठिकाणी दहा एकर जागा मिळण्याबाबत**" या विषयावरील **तारांकित प्रश्न क्रमांक ३९४.**

(ग) सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.योगेश टिळेकर यांचा "**खडकवासला (जि.पुणे) येथील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींना दूषित पाण्यामुळे त्रास झाल्याबाबत**" या विषयावरील **तारांकित प्रश्न क्रमांक १०८४**.

(घ) **तारांकित प्रश्न**

(च) **अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली व दुसरी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव –**

**"राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. एकनाथरावजी शिंदे यांना वारकरी संप्रदायातील मानाचा आद्य जगदगुरु श्री. संत तुकाराम महाराज पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव"**

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **मुख्यमंत्री** : "राज्यातील तरुणींना परदेशातील हॉटेलमध्ये चांगल्या नोकरीचे अमिष दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे. या विषयावरील श्री. जगन्नाथ शिंदे व इतर वि.प.स. नियम १०१ अन्वये उपस्थित

केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९२ वरील चर्चेच्यावेळी दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या आश्वासन क्रमांक ४ नुसार अधिक माहिती" सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **पणन मंत्री** : "महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सहासष्टावा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **महिला व बालविकास मंत्री** : "महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **कामगार मंत्री** " नाशिक येथील जिंदाल पॉलिफिल्म्स कंपनीत लागलेल्या आगीत दोन महिला कामगारांचा मृत्यु झाल्याबाबत. या विषयावरील श्री.विक्रम काळे व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५४ वरील चर्चेच्यावेळी दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या आश्वासन क्रमांक ६ नुसार अधिक माहिती" सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील कारागृहांमध्ये २०२३ ते २०२५ या २६-वर्षामध्ये रेशन, कॅंटिन व विद्युत उपकरणांच्या खरेदीमध्ये जवळपास ५०० कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा झालेला घोटाळा.

(२) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर शहराला पाणीपुरवठा करणारी ९०० मिमी व्यासाची जलवाहिनी टाकळी फाटा येथे निखळल्याने शहरात निर्माण झालेली पाणी टंचाई.

(३) **सर्वश्री एकनाथ खडसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १२ वर**

**जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री निवेदन करतील :-**

युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त श्री. कैलास नागरे यांनी खडकपुर्णा प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून शेतीला पाणी मिळावे यासाठी केलेली आत्महत्या.

(४) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

दिनांक २५ एप्रिल, २०२५ पर्यंत शालेय परीक्षा व संकलित मूल्यमापन चाचण्या आयोजित करण्याबाबतचा अकस्मात काढलेला आदेश सुधारित करणेबाबत.

(५) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १० वर कृषी मंत्री निवेदन करतील :-**

राज्यात शेतमालाला योग्य भाव मिळत नसताना दिवसेंदिवस बी-बियाणे व रासायनिक खतांच्या किंमतीमुळे शेतीच्या खर्चात होत असलेली वाढ.

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**
**(शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) व (१३)] —**

(१) **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील म्हाडामध्ये २३ निवृत्त अधिकाऱ्यांची ओएसडी म्हणून नियुक्ती करण्यात आल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून माहे मार्च, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास येणे, नियुक्त झालेल्या २३ अधिकाऱ्यांपैकी १० अधिकारी म्हाडाच्या दुरुस्ती मंडळात नियुक्त करण्यात आल्याचे उघड होणे, त्यांच्याकडे जुन्या आणि जीर्ण झालेल्या इमारतींच्या देखभालीची जबाबदारी असणे, नवे अभियंते आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांना संधी देण्याच्या गरजेच्या काळातही म्हाडाने निवृत्त अधिकाऱ्यांनाच प्राधान्य दिले असणे, निवृत्ती होऊन मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळातील अधिकाऱ्याची गेल्या ४ वर्षापासून सातत्याने फेरनियुक्ती केली जात असणे, वास्तविक ओएसडींची नियुक्ती एक वर्षासाठी करणे आवश्यक असताना मात्र, राजकीय दबाव वापरून कार्यकाळ

अग्रिम प्रत

वाढवून घेण्यात येत असणे, यामुळे प्रचंड आर्थिक गैरव्यवहार होत असल्याची जनमानसांत होत असलेली चर्चा, परिणामी जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.कृपाल तुमाने,** डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अन्न व नागरी पुरवठा विभागाने राज्यातील विविध विभागात डॅनेज पॅलेट पुरवठा करणेकरीता खाजगी पुरवठादाराची नेमणूक केलेली असणे, डॅनेज पॅलेटचा पुरवठा कंत्राट देताना कंत्राटदाराने दिलेले दर निविदेतील दरापेक्षा कमी असणे, त्यामुळे डॅनेज पॅलेटचा दर्जा कमी असल्याचे नुकतेच निदर्शनास आलेले असणे, डॅनेज पॅलेटचे कंत्राट मिळविण्याकरीता पुरवठादार कंत्राटदाराने अन्य कंत्राटदार किंवा कंपनीसोबत ज्वॉईंट व्हेंचर (जे.व्ही.) करणे, ज्वॉईंट व्हेंचर करताना नियमानुसार कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे या सर्व प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे, सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांकडे माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये लेखी निवेदनाद्वारा केलेली असणे, त्यानुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांना उक्त प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेशीत करणे, तथापी अद्यापपर्यंत उक्त प्रकरणी कोणतीच चौकशी वा कार्यवाही झालेली नसणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे डॅनेज पॅलेट पुरवठा करणाऱ्यांवर तसेच त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी या भागामध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत प्लॉटिंग करून नागरिकांना त्याची विक्री केली जात असणे. सदरचे प्लॉटिंग करताना मोठमोठे डोंगर सपाट करून त्यातील मुरमाचे उत्खनन केले जाणे, सदरचे प्लॉटिंग हे अनधिकृत असल्याने सामान्य गरीब नागरिकांना तिची विक्री केली जात असणे, परंतु प्लॉटिंग अनधिकृत असल्याने त्या

अग्रिम प्रत

नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होणे, आयुष्याची पुंजी खर्च करून स्वत:चे घर असावे या स्वप्नापोटी गोरगरीब नागरिक अशा प्रकारचे अनधिकृत खरेदी करतो आणि त्याची मोठ्या प्रमाणात फसवणूक होणे, सदर कोंढवा येवलेवाडी पिसोळी या भागात चालू असलेले डोंगरावरील उत्खनन अनधिकृत यांची विक्री याची पाहणी करून संबंधित प्लॉटिंग करणाऱ्या मालकावर तातडीने कारवाई करावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबधित विभागाकडे वारंवार लेखी तक्रार करणे, परंतु या तक्रारी कडे दुर्लक्ष केल्यामुळे हा प्लॉटिंगचा व्यवसाय राजरोसपणे चालू असणे, त्यामुळे अधिकाऱ्यांनी कारवाई न केल्यामुळे त्यांच्यावर संशय निर्माण होणे, यासाठी सदरचे चाललेले अनधिकृत मुरूम खोदाई व प्लॉटिंग बंद करून हे करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे केसनंद ता. हवेली, जि. पुणे येथील गट नं. १०१, १०२-(जुना स.नं. १६४ व १६५) या सुमारे ६५ एकर जमिनीबाबत सन १९१२ चे क.ड.ई. पत्र पाहता कब्जेदार सदरी श्री. गंगाराम लाडू माळी यांचे वारस म्हणून श्री. महादू गंगाराम माळी यांचे नाव दाखल असणे, तथापि सन १९३०- ३१ साली ७/१२ तयार होताना इतर व्यक्तींची नावे कोणत्याही फेरफाराने, दस्तऐवजाशिवाय तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या संमती शिवाय दाखल झालेले असणे, याप्रकरणी तहसिलदार हवेली, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या अहवालात मूळ मालकाच्या संमती शिवाय इतर व्यक्ती यांचे नावे कसे दाखल झाली त्याचा अभिलेखातील उपलब्ध कागदपत्रे पाहता बोध होत नाही असे स्पष्ट मत नोंदविलेले असणे, त्यामुळे याप्रकरणी प्रथम दर्शनी अनियमित्ता होऊन भ्रष्टाचार झाल्याचे निष्पन्न होणे, परिणामी मूळ खातेदारांच्या वारसांवर घोर अन्याय झाल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणे, यावरील अतिक्रमण काढण्याबाबत PMRDA ने आदेश देऊनही अतिक्रमण निष्कासित न होणे, चुकीचे तुकडेबंदी झालेल्या खरेदीखते करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून नोंद रद्द घेणे, याप्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करून मूळ जमिन मालक व त्यांच्या वारसदारांना न्याय देण्याची नितांत आवश्यकता, याप्रकरणी शासनाने करावायाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

(५) **सर्वश्री अभिजित वंजारी,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील १२५०० पेक्षा अधिक सार्वजनिक ग्रंथालय सुरू असून गेल्या अनेक वर्षात त्यांना मिळणाऱ्या अनुदानात वाढ न झाल्यामुळे सर्व सार्वजनिक ग्रंथालयाच्या भवितव्याचा प्रश्नचिन्ह निर्माण होणे, 'अ' वर्गातील ग्रंथालयांना रू.७.२० लाख अनुदान, तर 'ब' वर्गातील ग्रंथालयांना रू.३.६० लाख, 'क' वर्गातील ग्रंथालयांना रू.१.५३ लाख, 'ड' वर्गातील ग्रंथालयांना रू.४८.०० हजार, वार्षिक अनुदान मिळत असणे, या अनुदानामध्ये तिथे काम करणारे कर्मचा-यांचे वेतन, पुस्तके खरेदी व वर्तमानपत्र, मासिके व फर्निचर खरेदी इत्यादी खर्च अत्यल्प अनुदानातून करावा लागणे,ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या सार्वजनिक ग्रंथालय मोठ्या प्रमाणात उपयोग असूनसुध्दा या चळवळीकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, तसेच गेल्या अनेक वर्षापासून राज्याची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असून त्या तुलनेमध्ये आजही या सार्वजनिक ग्रंथालयाची संख्या अपूरी पडत असणे गेल्या अनेकवर्षापासून एकही नवीन सार्वजनिक ग्रंथालयाला शासनाने परवानगी दिलेली नसल्यामुळे या चळवळीला अडचण निर्माण झाली असणे, शासनाच्या वित्त व नियोजन विभागाच्या वेगवेगळ्या विकासाच्या योजनेमध्ये उदा. नाविण्यपूर्ण योजना अथवा ग्रामीण विकास योजना यामध्ये शासकीय ग्रंथालयांना कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत मिळत नसणे, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधी वितरणामध्ये जिल्हा प्रशासनाची सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रति उदासिनता असल्यामुळे दिवसेंदिवस ही चळवळ खुंटत चालली असल्याने याबाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता."

(६) **सर्वश्री मिलिंद नार्वेकर,** सुनिल शिंदे, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"टिपेश्वर अभयारण्यातील 'पिसी' वाघिणीच्या गळयात तारेचा फास अडकल्याची घटना ताजी असतानाच पांढरकवडा वनविभागाच्या मुकुटबन वनपरीक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या पवणार गावानजीक 'टी नाईन' नावाच्या वाघिणीच्या गळयात तारेचा फास अडकल्याची घटना दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली असणे, गळयात फास अडकलेल्या एका

अग्रिम प्रत

वाघिणीचा शोध संपत नाही, तोच दुसरी वाघीण फासात अडकल्याने वन विभागात उडालेली खळबळ, टिपेशवर आणि पांढरकवडा परिसरात वन्यजीवांची संख्या मोठी असणे, टिपेश्वर मधील पिसी वाघिणीच्या गळ्यात अडकलेली तार काढून तिला रेस्क्यू करून उपचार देण्यात रेस्क्यू टीमला आलेले अपयश, आता 'टी नाईन' वाघिणीसाठी देखील रेस्क्यू टीम दाखल करण्यात आली असणे, विशेष म्हणजे 'टी नाईन' वाघिणीच्या गळ्यात अडकलेला शिकारीचा फास हा 'पिसी' वाघिणीच्या शिकारीसाठी वापरलेल्या तारेसारखाच असणे, त्यामुळे ससे, हरिण, मोर या प्राण्यांच्या शिकाऱ्यांनी आता वाघाच्या शिकारीकडे मोर्चा वळविला असल्याची दाट शक्यता निर्माण झाले असणे, टिपेश्वर अभयारण्य वाघांच्या अधिवासासाठी प्रसिद्ध असून येथे हमखास व्याघ्रदर्शन होत असल्याने पर्यटकांचीही सातत्याने गर्दी असणे, वाघिणींच्या गळ्यात फास अडकल्याच्या दोन घटना उजेडात आल्याने पर्यटकांसोबतच शिकारी देखील सक्रिय झाल्याची भीती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होणे, यास्तव टिपेश्वर आणि पांढरकवडा परिसरातील वाघांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री.हेमंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोरोना काळात म्हणजेच सन २०२० आणि सन २०२१ अशा दोन विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शासकीय शाळांनी विशेष प्रयत्न केलेले असणे, सन २०२२ मध्ये मोठ्या प्रमाणावर शासकीय शाळांचा पट वाढलेला असणे, यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचून शासकीय शाळा शिक्षकांनी काम केलेले असणे, मात्र सरकारी शाळांमध्ये स्वच्छता गृहांची उपलब्धता नसणे, विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, ग्रंथालय तसेच संगणक यासारख्या अन्य सोयी-सुविधा नसणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांची पाऊले पुन्हा खासगी शाळांकडे वळली असून, दोन वर्षांत पहिली ते पाचवीच्या नोंदणीत पाच ते सहा टक्के तर सहावी ते आठवीच्या पट नोंदणीत सात ते आठ टक्क्यांनी घट होणे, तसेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता देखील खालावलेलीच असणे, परिणामी सोयी-सुविधांअभावी राज्यातील सरकारी शाळा ओस पडू नयेत व शालेय स्तरावरील शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे तसेच राज्यातील शासकीय शाळेतील पटसंख्या वाढवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मोठ्या प्रमाणात शहरी व ग्रामीण भागात सुरु असलेले खाजगी कोचिंग क्लासेस, शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी सुरु असलेले शैक्षणिक स्पर्धा यामध्ये आपल्या मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून अनेक पालक विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासेसमध्ये लाखो रुपये फी भरुन घेत असलेला प्रवेश, यामध्ये विशेषत: जीईई व नीट अशासारखे तांत्रिक व वैद्यकीय प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांमध्ये असलेली स्पर्धा,याचा फायदा क्लासेस मालकांकडून घेण्यात येऊन लाखो रुपयांची फी आकारण्यात येणे, मात्र त्याची कोणत्याही प्रकारची पक्की पावती देण्यात न येणे, व या उत्पन्नाची कुठेही नोंद नसल्यामुळे शासनास यामधून मिळणारा कर देखील भरण्यात न येणे, या माध्यमातून शासनाची फसवणूक करणे खाजगी कोचिंग क्लासेस विद्यार्थ्यांना शिकविताना कोणतीही नियमावली नसणे तसेच किती शुल्क आकारावे याची मर्यादा नसणे, यामध्ये विद्यार्थ्यांची होत असलेली आर्थिक पिळवणूक, आपल्या पाल्यास चांगले शिक्षण मिळावे म्हणून गोरगरीब व शेतकऱ्यांची मुले देखील नाईलाजास्तव अशा खाजगी शिकवणीमध्ये प्रवेश घेताना त्यांना द्यावे लागणारी फी ही त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात जास्त असणे, अशी मुले स्पर्धेत भाग घेण्यासाठी मागे राहण्याची शक्यता लक्षात घेऊन कोचिंग क्लासेसना प्रवेश घेऊन लाखो रुपये फी भरुन कर्जबाजारी होत असणे,या खाजगी कोचिंग क्लासेसवर शासनाचे आवश्यक नियंत्रण राहण्यासाठी शासनाने मार्गदर्शक नियमावली तयार करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

(९) **सर्वश्री विक्रम काळे,** अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यामध्ये दि. १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक तसेच सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी पेन्शन योजना (DCPS) लागू करण्यात येणे, परंतु दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्यांसाठी सन १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू असणे, शालेय शिक्षण विभागांतर्गत दि. १ नोव्हेंबर,

२००५ पुर्वी सेवेत आलेले परंतु त्यांची शाळा तदनंतर १००% अनुदानावर आलेल्या असणे, त्यामुळे त्यांची जुन्या पेन्शन योजनेची जी.पी.एफ खाती आजरोजी सुरु असणे, परंतु त्यांच्या वेतनातून कपात होणारी जी.पी.एफ ची वजावट बंद करणे, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाचे हप्ते त्यांच्या खात्यावर जमा न होणे, त्यांची नियुक्ती दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीची असणे, म्हणून त्यांना नियमानुसार सन १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागु करणे गरजेचे असणे, वारंवार मागणी व आंदोलने होणे, शासनाने आतापर्यंत यासाठी विविध ३ समित्यांचे गठन करणे, तत्कालीन सरकारने दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी ज्यांची पदभरतीची जाहिरात होती, व नियुक्ती तद्नंतर केलेली असणे, त्या सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, परंतु या सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शनपासून वंचित ठेवणे, त्यामुळे दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्या व त्यानंतर १००% अनुदान मिळालेल्या सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना सन १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करणे, याबाबत शासनाने प्रतिक्रया व शासनाची उपाययोजना."

(१०) **श्री.सुधाकर अडबाले, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आदिवासी विकास विभागाअंतर्गत अनुदानित आश्रमशाळेतील ११५५ शिक्षकांना मानधन/वेतनाची थकबाकी अदा करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दि. २२.११.२०१८ च्या पत्रानुसार निर्देश दिले असणे, प्रलंबित थकीत वेतन अदा करण्याबाबत निर्देश असतानाही अजूनही कुठलीही कार्यवाही न होणे, त्यामुळे शिक्षकांत तीव्र असंतोष असणे, सदर नियुक्ती दिनांकापासून विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या ११५५ शिक्षकांना मानधन/वेतनाची थकबाकी तात्काळ अदा करणे याबाबत शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(११) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **खनिकर्म मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागडमध्ये मोठ्या प्रमाणावर लोहखनिज साठे असून सन २००७ मध्ये लॉयड्स मेटल्स कंपनीला ३४८.९ हेक्टर क्षेत्रात उत्खननास परवानगी देण्यात येणे, सन २०२३ मध्ये तब्बल ४६८४ हेक्टर क्षेत्रावर सहा नवीन खाणी प्रस्तावित करणे,त्यामुळे वनहक्क कायदा (२००६) अंतर्गत

अप्रकाशित प्रत

सुमारे ४०,९०० आदिवासी विस्थापित होण्याची शक्यता असणे, सन २०११ ते २०१६ या कालावधीत आदिवासींच्या सततच्या आंदोलनानंतरही उत्खनन सुरू असणे, सन २०२१ मध्ये १०,००० हून अधिक आदिवासींनी सरकारविरोधात आंदोलन केल्यानंतर त्यांचेवर पोलिस कारवाई करण्यात येणे, खनिजाची वाहतूक करणाऱ्या ट्रकमुळे झालेल्या अपघातात अनेक नागरिक अपघातग्रस्त होवूनही त्यांना कोणतीच मदत न मिळणे,खाणीतील दुषित पाणी शेतामध्ये गेल्याने शेती उत्पादनावर झालेला परिणाम, केंद्र सरकारने सन २०२३ मध्ये वार्षिक १० दशलक्ष टन लोहखनिज उत्खननास परवानगी दिलेली असणे, तसेच,मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल होऊनही सरकारने अद्याप उत्तर दिलेले नसणे, सन २००६ मध्ये मिळालेली पर्यावरण मंजुरी ५ वर्षांसाठी असतानाही, २०११ ते २०२३ दरम्यान मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उत्खनन केलेले असणे, लॉयड्स मेटल्स कंपनीला लोहखनिज मुक्त विक्रीस मोकळीक दिल्यामुळे शासनाचे १०,००० कोटींपेक्षा अधिक नुकसान झालेले असणे, सुरजागड खाणीमुळे स्थानिक आदिवासींच्या विस्थापनाचा धोका निर्माण झाला असून, पर्यावरणीय संकट अधिक तीव्र झालेले असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी तात्काळ चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र व राज्य शासनाकडून पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यातील ७ हजार १७० शेतकऱ्यांचे सन २०२३-२४ मधील ठिबक सिंचनचे तब्बल १८ कोटींहून अधिक रकमेचे अनुदान रखडलेले असणे, जिल्ह्यातील एकूण ७ हजार १७० शेतकरी ठिबक सिंचन अनुदानासाठी पात्र ठरलेले असणे, परंतु २०२३-२४ मध्ये केवळ ७१५ शेतकऱ्यांनाच अनुदान मिळालेले असणे, उर्वरित सर्व पात्र लाभार्थी शेतकरी हे गेल्या वर्षभरापासून अनुदानाअभावी वंचित असणे, सरकारकडून शेतकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे, “महाडीबीटी” च्या माध्यमातून लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्यात होत असलेला विलंब, शासकीय अनुदान मिळेल या आशेवर शेतकऱ्यांनी लाखो रूपयांचे कर्ज काढून उसनवारीवर महागड्या कंपन्यांचे ठिबक सिंचन बसविलेले असणे, शासनाकडून अनुदान

असुधारित प्रत

वाटपात होत असलेला विलंब व सांगली जिल्हा कृषी विभागाकडून याबाबत कोणतेही प्रयत्न होत नसल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला असणे, शासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे असंख्य शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आलेली असणे, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तात्काळ अनुदान वितरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१३) **श्री.विक्रांत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने सन २०१९ मध्ये ओपन भरती प्रक्रिया राबवून ३ हजार सुरक्षा रक्षकांची नोंदणी करणे, मात्र गेल्या ५ वर्षापासून २५०० सुरक्षा रक्षक प्रतिक्षा यादीवर असूनही त्यांना रायगड सुरक्षा मंडळातील अधिकारी यांनी जाणीवपूर्वक आस्थापणेवर नियुक्ती न देणे, सुरक्षा रक्षक पदाची आस्थापनाकडून मागणी नसल्यामुळे नियुक्ती करण्यात येऊ शकत नाही अशी माहिती मंडळाच्या अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना सातत्याने देण्यात येणे, नोंदीत प्रतिनिधींना क्रमशः नोकरी देणे अपेक्षित असताना वास्तवात तसे होत नसणे, परिणामी प्रतिक्षा यादीत असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण पसरलेले असणे, महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या रायगड सुरक्षा रक्षक मंडळात प्रतिक्षा यादीतील सुरक्षा रक्षकांची आस्थापनेवर प्राधान्याने नियुक्त करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दि.१५/१/२०२५ रोजी मा.कामगार मंत्री यांना निवेदन दिलेले असणे, शासनाने रायगड जिल्हा सुरक्षा मंडळातील प्रतिक्षा यादीतील जिल्हा सुरक्षा रक्षकांची आस्थापनांमध्ये तातडीने नियुक्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया,"

(१४) **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे आस्थापना अधिक्षक यांच्यावर लाचलुचपत न्यायालयीन प्रकरणी प्रलंबित असणे, आस्थापना अधिक्षक यांनी स्वत:चा सहायक आयुक्त पदाच्या मान्यतेचा प्रस्ताव आस्थापना अधिक्षक असतांना तयार करणे, आस्थापना अधिक्षक यांची सहायक आयुक्त मीरा-भाईंदर महानगरपालिका पदावरील अंतिम मान्यता प्रस्ताव जाणीवपूर्वक नगरविकास

अप्रकाशित

विभागातील काही अधिकारी यांनी व तत्कालिन आयुक्त यांनी संगनमताने आस्थापना अधिक्षक यांची लाचलुचपत फौजदारी न्यायालयीन प्रकरणे पडताळणी न करता दुर्लक्षित करुन महाराष्ट्र शासन अंतिम मंजूरीकरिता देण्यात आलेला असणे, उपसचिव, अवर सचिव, नगरविकास विभाग यांनी व तत्कालिन आयुक्त यांनी संगनमताने आपल्या पदाचा दुरुपयोग करुन शासन स्तरावरील विविध शासन निर्णयाचे व पत्रांचे उल्लंघन करणारा प्रस्ताव पाठवून तो मंजुरदेखील करणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे व मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी सदर नस्तीची, संचिका, अधिग्रहित करुन चौकशी करुन देखिल सहायक आयुक्त यांची मीरा-भाईंदर महानगरपालिका येथील सहाय्यक आयुक्त या पदावरील मान्यता तात्काळ रद्द करण्यास होत असलेल्या दिरंगाईबाबत कार्यवाही करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१५) **सर्वश्री. प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री. सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील गिरगावात इमारतींचा पुनर्विकास रखडलेला असणे, याअनुषंगाने मुंबई रिपेअर बोर्डाने बांधलेल्या ३५ इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहन क्षेत्रफळात करावयाची वाढ, याच बोर्डाच्या एकल इमारतीलगतच्या उपकरप्राप्त किंवा खाजगी घरमालकांबरोबर जॉईंट व्हेंचरने करावयाचा पुनर्विकास, मालक परागंदा झालेल्या उपकरप्राप्त इमारतींमधील रहिवाशांना इजमेंट राईटनुसार करावयाचे जमिनीचे हस्तांतरण, विकासकांबरोबर एमओयु केलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या घरमालकांची प्रसिध्द करावयाची यादी, एकापेक्षा जास्त विकासकांबरोबर करार केलेल्या स्वमालकीच्या मालमत्ता गोठवून त्यांचे पुनर्वसन अतिरिक्त क्षेत्रफळातून मिळणाऱ्या घरांच्या ठिकाणी करणे, पागडीच्या इमारतीतील रहिवाशांना संरक्षण देण्याची आवश्यकता असणे, गिरगावातील पागडी/बेनामी धोकादायक इमारती उपकर निधीतून किंवा शासनाने अर्थसहाय्य देऊन रहाण्यायोग्य करुन देणे, गिरगावातील संक्रमण शिबिरात रहात असलेल्या लोकांचे पुनर्वसन मास्टर लिस्टमध्ये अग्रक्रम देऊन करणे, गिरगावातील प्राचिन मंदिरांचे सन्मानजनक पुनर्वसन करणे, मुंबई रिपेअर बोर्डाने पुनर्रचित केलेल्या व गृहनिर्माण संस्थांना मालकी तत्वावर वितरीत केलेल्या इमारतींचे अभिहस्तांतरण

अप्रकाशित पत्र

तातडीने करणे, मुंबई मेट्रोमुळे बाधित रहिवाशांचे पुनर्वसन करणे, अशा मागण्या विधानपरिषद सदस्यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्राने केल्या असणे, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(१६)** **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ना.म.जोशी मार्गावरील बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पात संबंधित अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे प्रकल्पग्रस्त रहिवाश्यांत निर्माण झालेली संभ्रमावस्था, येथील रहिवाश्यांना नवीन घरांत स्थलांतरित करण्याचे प्रस्तावित असणे, परंतु बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीत रहिवाश्यांच्या सदनिका आणि व्यावसायिक गाळे यांच्यात वाढ होऊनही मुंबई महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या जुन्या आणि तेवढ्याच क्षमतेचे असणे, परिणामी रहिवाश्यांना पुरेसे पाणी मिळण्याबाबत निर्माण झालेली साशंकता, येथील रहिवाश्यांना संक्रमण शिबिरात न पाठविता नवनिर्वाचित इमारतीत स्थलांतरित करण्याबाबत दिलेल्या आश्वासनास अधिकाऱ्यांनी दिलेली तिलांजलि, ऐन परीक्षेच्या आणि सणासुदीच्या कालावधीत रहिवाश्यांना घरे खाली करण्याबाबत अधिकाऱ्यांकडून सुरू असलेला दबाव, येथील ६० वर्षापासूनच्या सामाजिक संस्था, क्रिडा मंडळ, व्यायामशाळा यांचे न झालेले सर्वेक्षण, त्यामुळे त्यांच्या पात्रतेबाबत निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, या ठिकाणच्या वर्षानुवर्षे असलेल्या स्टॉलधारकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असणे, सदरहू स्टॉलधारकांकडे सर्व कायदेशीर पुरावे उपलब्ध असतानाही सक्षम प्राधिकारी यांच्या भ्रष्ट कारभारामुळे पात्र स्टॉलधारकांवर अपात्र ठरणे, सक्षम प्राधिकारी यांच्या कार्यालयातील दलालांकडून तसेच स्टॉलधारकांकडून लाखो रुपये उकळून प्रकल्पासाठी पात्र करून देण्याचा सुरू असलेला गोरखधंदा, त्यामुळे प्रकल्पाग्रस्तांच्या पात्रतेबाबतचा निर्णय संचालक, बीडीडी चाळ यांच्या निर्णयकक्षेत आणण्याची असलेली नितांत आवश्यकता, त्यामुळे बीडीडी चाळवासीयांना हरतऱ्हेने वेठीस धरणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(१७)** **सर्वश्री सदाशिव खोत,** अंबादास दानवे, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शेतकरी देवस्थान इनाम जमिनी शेकडो वर्षे कसत असणे, राज्यातील देवस्थानच्या इनाम जमिनीत असणाऱ्या शेतकऱ्यांची शेतकऱ्यांच्या नावे कायद्याने करावे अशी मागणी राज्यातील शेतकऱ्यांकडून सातत्याने होणे, यापूर्वी मराठवाड्यातील इनाम व देवस्थानचे वर्ग दोन च्या जमिनीवर वर्ग एक मध्ये करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, त्याच धर्तीवर देवस्थान इनाम जमिनीच्या सातबारावर ती जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांची नावे समाविष्ट करण्याची आवश्यकता असणे, शेतकऱ्यांची नावे इतर हक्कांमध्ये टाकल्यामुळे शेतकरी पंतप्रधान किसान सन्मान योजना पासून वंचित असणे, शेतकऱ्यांना कर्ज मिळत नसणे, शेजारील राज्य कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश प्रमाणे महाराष्ट्रात देखील देवस्थान इनाम जमिनी खालसा करून त्या शेतकऱ्यांच्या नावे करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१८)** **सर्वश्री जयंत आसगावकर,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री. धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील लोकप्रतिनिधी यांनी माध्यमिक विद्यालय-शिरगाव, वारू कोथूर्णे माध्यमिक विद्यालय-कोथूर्णे, भैरवनाथ माध्यमिक विद्यालय-घोनशेत, माध्यमिक विद्यालय-सांगिसे, स्व.वामनराव हैबतराव देशमुख माध्यमिक विद्यालय-देवघर या शाळांना विद्यार्थी पटसंख्येचे कारण देत दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून ४० टक्के व दिनांक १ जानेवारी, २०२३ पासून ६० टक्के अनुदानासाठी अपात्र ठरविणे, संपूर्ण मावळ तालुका हा डोंगरी भागात येत असून शासन निर्णयानुसार डोंगरी भागातील शाळांना शेवटच्या वर्गातील पटसंख्या २० असणे अपेक्षित, सदर शाळांच्या शेवटच्या वर्गात संच मान्यतेनुसार २० पेक्षा जास्त पटसंख्या असून शासन निर्णयाप्रमाणे ती पटसंख्या पुरेशी असणे, सदर शाळांच्या अनुदान प्रस्तावासोबत मावळ तहसीलदारांचा दाखला असणे, परंतु शहरी भागासाठी लागू असलेले निकष या शाळांसाठी ग्राह्य धरून पटसंख्येचे कारण देत सदर शाळा अपात्र ठरविणे, या शाळा सन २०१६

अप्रकाशित प्रत

पासुन २० टक्के अनुदान घेत असताना सध्या या पाचही शाळांमधील कर्मचारी सुमारे २६ महिने ४० टक्के तर १० महिने ६० टक्के अनुदानापासून वंचित असणे, सुधारित अनुदानाकरिता सदर प्रस्ताव शिक्षण आयुक्त, पुणे यांच्या शिफारसीने शासनाकडे सादर केले असताना मान्यतेकरीता शासनाकडे प्रलंबित असणे, शासकीय अधिकाऱ्यांच्या चुकीच्या अहवालामुळे अपात्र ठरलेल्या या पाच शाळांना ६० टक्के अनुदान देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१९) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील विविध विभागातील वर्ग-१ ते वर्ग ४ ची सरळसेवा व पदोन्नतांची दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ अखेर २,८८४ पदे मंजूर असणे, तर मंजूर पदांपैकी १,६२७ पदे भरलेली असून १,२५७ (५० टक्के) पदे रिक्त असणे, त्यामुळे अध्यापन व संशोधन कार्यास अडचणी येत असणे, रिक्त पदाच्या संख्येमुळे एका कर्मचाऱ्यास तीन-तीन पदांचे कामे करावे लागत असणे, परिणामी शेतकऱ्यांना वेळेवर सल्ला मिळत नसणे, मागील आठ वर्षापासून शिक्षक व शिक्षकेत्तर पदाची भरती झाली नसल्याने पदोन्नतीसाठीही पात्र शिक्षक उपलब्ध नसणे, त्यातच मागील वर्षी चार नवीन महाविद्यालये व दोन संशोधन केंद्र मंजूर झाले असून त्यासाठी अद्याप पद निर्मिती केली नसणे, माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये कृषि विद्यापीठाने बिंदू नामावली मंजूर करुन घेतली असणे, तरीही शासन रिक्त पदे भरण्यास परवानगी देत नसणे, कार्यरत कर्मचाऱ्यावर कामाचा अतिरिक्त ताण येत असणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कमतरतेमुळे शैक्षणिक कार्यास अडचणी येत असणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा व गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने रिक्त पदे भरणे आवश्यक असणे, कृषि विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तरची रिक्त पदे भरणेसाठी तात्काळ कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२०) **ॲड.निरंजन डावखरे,** श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अप्रकाशित मत

"प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., सातारा यांनी सन २०१२ मध्ये शासकीय परिपत्रक दिनांक १७ मार्च, २०११ च्या निकषाची पूर्तता न करता अतिरिक्त पदांना मान्यता देऊन चुकीचा स्टाफिंग पॅटर्न वापरून नियमबाह्य नोकरभरती केली असणे, उक्त कर्मचाऱ्यांना न्यायालयाच्या आदेशाने संचालक मंडळाच्या दिनांक ३० जुलै, २०१७ च्या ठरावाने नोकरीतून कमी करून पुन्हा १५ महिन्यांचा पगार देऊन नियमबाह्य कामावर घेतले असणे, यामध्ये मोठा गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार सहाय्यक निबंधक, सातारा यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये केली असणे, उक्त तक्रार प्रलंबित असतानाच सन २०१९ मध्ये देखील याच नियमबाह्य स्टाफिंग पॅटर्नचा आधार घेऊन भरती केली असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये झालेल्या वेतन करारात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा ठपका सातारा स्थानिक गुन्हे शाखेने संचालक मंडळावर ठेवलेला असणे, बँकेचे सहाय्यक लेखाधिकारी यांना सेवानिवृत होण्यापूर्वी ४ दिवस नियमबाह्य पदोन्नती देऊन उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदावर २ वर्ष मुदतवाढ दिली असणे, तक्रारीवरून सहाय्यक निबंधक यांनी त्यांना पदावरून काढले असणे, परंतु नियमबाह्य पदोन्नती देणाऱ्या संचालक मंडळावर कोणतीही कार्यवाही केली नसणे, जागा खरेदी, इमारत उद्‌घाटने, शताब्दी महोत्सव अशा कार्यक्रमावर केलेल्या खर्चात देखील मोठा गैरव्यवहार झाला असल्याची शक्यता सभासदांनी व्यक्त केलेली असणे, यामुळे ११ हजार सभासदांमध्ये पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## -मध्यंतर-

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ व शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) [अनुक्रमांक (१)]**

(१) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शिवाजीराव गर्जे, विक्रम काळे, **वि.प.स यांची म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

अप्रकाशित

"महाराष्ट्राच्या भूमीला संतांची, महापुरुषांची मोठी परंपरा असून त्यांची शिकवण, संस्कार महाराष्ट्राच्या भुमीमध्ये खोलवर रुजलेली असणे, त्यामुळे महाराष्ट्राची एक वेगळी ओळख निर्माण झालेली असणे, मात्र समाजातील काही समाजद्रोही लोकांकडून या महापुरुषांच्या गौरवशाली, प्रेरणादायी आणि महाराष्ट्राला मार्गदर्शक असणाऱ्या इतिहासाला डाग लावण्याचा प्रकार होत असून नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये महापुरुषांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात येणे, थोर इतिहास संशोधक, तज्ञ यांनी संशोधनातून सिध्द केलेल्या इतिहासाला वेगवेगळ्या सोशल मिडियामधून आक्षेपार्ह विधानातून महापुरुषांचे चरित्र हनन करण्याचा प्रयत्न होत असणे, व त्यांच्याबाबत वेगवेगळ्या समाज माध्यमांमध्ये आक्षेपार्ह लिखाण करण्यात येणे, छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास अभ्यासता यावा यासाठी सरकारने इतिहास संशोधकांच्या अध्यक्षतेखाली चरित्र साधन समिती गठीत करावी, संभाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास मराठी पाठ्यपुस्तकांसह इंग्रजी सी.बी.एस.सी अभ्यासक्रमात अंतर्भूत करण्यात यावा त्याचप्रमाणे विकिपीडिया, शासकीय मुद्रणालयामध्ये उपलब्ध साहित्य, गुगल, युट्यूब, सिनेमा या ठिकाणी उपलब्ध असलेल्या कपोलकल्पित माहितीवर कायमस्वरुपी बंदी घालण्यात यावी, यासाठी स्वतंत्र कायदा करुन त्यांची विटंबना होणार नाही, असे होणे अत्यंत गरजेचे आहे, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) [अनुक्रमांक (२) व (३)]**

**(२) ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स यांची म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"ठाणे जिल्ह्यातील भाईंदर (प) मधील उत्तन चौकात शरीफ हजरत सय्यद बालेशहा पीर नावाचे अनधिकृत धार्मिकस्थळ असणे, सदर अनधिकृत धार्मिकस्थळ राष्ट्रीय सुरक्षिततेच्यादृष्टीने अतिशय धोकादायक असणे, सन २०११ मध्ये तत्कालीन अपर पोलीस अधीक्षक, वसई यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी, ठाणे यांना लेखी स्वरुपात सदर अनधिकृत धार्मिकस्थळ निर्माण होत असल्याबाबत कळविणे, सदर प्रकरणी महसूल विभागाने कोणतीही कारवाई केली नसल्याने सदर अनधिकृत धार्मिकस्थळाजवळ अवैध घडामोडी घडत

असणे, अनधिकृत धार्मिकस्थळ वेळेवर निष्कासित न केल्यामुळे अशाच प्रकारच्या शासकीय जमिनी अनधिकृतपणे बळकाविण्याचा प्रयत्न इतर ठिकाणी होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री इद्रिस नायकवडी,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, **वि.प.स यांची म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिपायांची पदे व्यपगत करण्यात आली असून त्याऐवजी शिपाई भत्ता त्यांना अनुज्ञेय करण्यात आलेला असणे, तथापि, शिपाई भत्ता अत्यंत अपुरा असून त्याऐवजी कर्मचारी उपलब्ध होत नसणे, तसेच तात्पुरत्या स्वरुपातील कर्मचारी हा शासनाची जबाबदारी स्वीकारीत नसणे, त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना जबाबदार धरता येणे शक्य नसणे, राज्यातील शाळांमधील संरक्षणाचा प्रश्न अत्यंत गंभीर असणे, त्यामुळे शिपायांची पदे नियमित करण्याबाबत कारवाई करणे, तसेच बदलापूरसारख्या (जि.ठाणे) घटना घडल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या संरक्षणांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री. विक्रम काळे, सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, वि.प.स यांची म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यामध्ये मराठी ही आमची मातृभाषा केंद्रशासनाने नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिलेला असणे, परंतु, या महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी शाळांवरच गंडांतर येत असणे, मराठी शाळांना टाळे लागणार की काय अशी भिती निर्माण होणे, इंग्रजी शाळांच्या वाढत्या संख्येमुळे राज्यातील मराठी शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश संख्या कमी होणे, शाळांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना आधारकार्डची सक्ती करणे, त्यानंतर आधार असलेल्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड व्हॅलीड असले पाहीजे, याची सक्ती करणे, अनेक विद्यार्थ्यांच्या आधार कार्डात काही दोष असल्यामुळे तसेच विद्यार्थी वर्गात प्रवेशीत असूनही व त्याचे आधार कार्ड असतांनाही विद्यार्थी इनव्हॅलीड होणे, परिणामी त्या त्या शाळेतील संख्या कमी होणे, त्याचा परिणाम संच मान्यतेवर होणे, परिणामी शिक्षक-कर्मचारी अतिरिक्त होण्याची भिती निर्माण होणे, संचमान्यता ऑनलाईन असल्यामुळे व त्याचे काम पुण्याहून होत असल्यामुळे अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या असूनही संबंधीत शाळांना सदोष संचमान्यता मिळणे, त्याच्या दुरुस्तीसाठी शाळावाल्यांना

पुण्याला वारंवार चकरा माराव्या लागणे, या संच मान्यता दुरुस्त न झाल्याने त्या संस्थांचे रोस्टर तपासून न मिळणे, परिणामी पवित्र पोर्टलवर शिक्षक भरती करण्यासाठी त्यांची संधी हुकणे, नुकत्याच दिनांक १५ मार्च, २०२५ च्या संच मान्यतेच्या शासन निर्णयामुळे अजुन संकटात भर पडणे, निकषांनूसार पटसंख्या होत नसल्याने अनेक शाळा बंद पडण्याची भिती निर्माण होणे, त्यामुळे पुर्वी प्रमाणे २० पटाखालील वर्गासाठी एक शिक्षक असा निकष कायम ठेवणे, परिणामी संच मान्यतेच्या निकषात सर्व समावेषक बदल करणे गरजेचे असणे, शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी अनुदानास पात्र शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वर्गतुकड्यांना २०% अनुदान, २०% व ४०% अनुदान घेत असलेल्या शाळांना ६०% व ८०% असा पुढील टप्पा देण्याचा निर्णय घेणे, परंतु, गेल्या दोन अधिवेशनात व आता अर्थसंकल्पात त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचा निर्णय न होणे, यापुढे टप्पा अनुदानावर आलेल्या शाळांना प्रचलित धोरणानूसार १००% अनुदान देण्याबाबत निर्णय करण्याची गरज असणे, आजपावेतो सन २०१८ मध्ये शेवटच्या वर्गात ३० पटसंख्या नसल्यामुळे, शिक्षक मान्यतेची कागदपत्रे जुळत नसल्यामुळे, चुकीच्या संच मान्यतेमुळे आजपावेतो राज्यातील शेकडो शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांना व वर्गतुकड्यांना जाहीर केलेले अनूदान वितरीत न होणे, आजही मुल्यांकनाअभावी तसेच मुल्यांकन पुर्ण झालेल्या शाळांनासूध्दा शासन निर्णयाप्रमाणे अनुदान मिळणे गरजेचे असणे, राहिलेल्या शाळांना यापुढे स्वयंअर्थसहाय्यीत करण्याचा निर्णय मागे घेणे गरजेचे असणे, १००% अनुदानीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात सेवानिवृत्तीने शिक्षकाचे पद रिक्त झाल्यास त्याच संस्थेच्या इतर शाखेत विनाअनुदानवर किंवा टप्पा अनुदानावर कार्यरत शिक्षकाची बदली १००% अनुदानित पदावर बदली करण्याचे पुर्वीप्रमाणे शिक्षण अधिकारी व उपसंचालकाला अधिकार देण्याबाबत नुकताच न्यायालयाने निवाडा देणे, परंतु, त्यावर शासनाचा निर्णय न होणे, परिणामी, संबंधीत कार्यरत शिक्षकावर अन्याय होणे, सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता तातडीने अंतिम करुन अतिरिक्त होणाऱ्या शिक्षक-कर्मचाऱ्यांची समायोजन होणे व त्यानंतर रिक्त राहणारी शिक्षक-कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत ठोस कृती कार्यक्रम करण्याची गरज असणे, कंत्राटी पध्दतीने सेवानिवृत्त शिक्षकांना सेवेत घेण्याचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्याची गरज असणे, शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा व कुटूंबाशी निगडीत असलेला दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या व त्यानंतर सेवेत आलेल्या सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेण्याची गरज असणे, खाजगी

अप्रकाशित

शाळांना सरकारी शाळांचा दर्जा देण्याबाबत राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केलेल्या प्रस्तावाचे नेमके स्वरुप राज्यातील सर्व शिक्षण प्रेमींना कळणे गरजेचे असणे, उर्दु माध्यमांच्या शाळेमध्ये मराठी भाषा फाऊंडेशन शिकवण्यासाठी मानसेवी शिक्षक नेमण्यासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथील करण्याची गरज असणे, राज्यात कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक-कर्मचाऱ्यांना तसेच मानव विकास शिक्षकांना इतर शाळांतील शिक्षक-कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणीत वेतन मिळणे गरजेचे असणे, वर्षानुवर्षे सुरळीतपणे सुरु असलेला शैक्षणिक वर्षाचा कालावधी माहे जून ते ३० एप्रिल असाच ठेवणे भौतिकदृष्ट्याही गरजेचे असणे, शिक्षक-कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण पूर्वीप्रमाणेच ऑनलाईन पध्दतीनेच देणे गरजेचे असणे, शिक्षकांवरील अध्यापनाशिवाय असलेला इतर सर्व कामांचा बोजा कमी करणे गरजेचे असणे, शाळांची व्यवस्थापन गुणवत्तापूर्ण होण्यासाठी त्या-त्या जिल्ह्याला आवश्यक असलेले आधिकाऱ्यांचे मनुष्यबळ पुरविणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : शासकीय विधेयके —**

**(क) पुर:स्थापनार्थ — विचार,खंडश: विचार व संमत करणे :-**

"सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ६ — महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०२५"

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ — महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक २०२५"

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ — महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक २०२५"

**(१) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६५ सदस्यांच्या संयुक्त

समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र खाजगी पदयोजना एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५"

---

**नऊ : राजशिष्टाचार मंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :-**

ज्याअर्थी, “भारतरत्न” हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे. एखाद्या क्षेत्रात असाधारण आणि सर्वोच्च कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. राजकारण, कला, साहित्य आणि विज्ञान क्षेत्रातील विचारवंत, शास्त्रज्ञ, उद्योगपती, लेखक आणि समाजसेवक यांना या पुरस्काराने गौरवण्यात येते.

आणि ज्याअर्थी, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी उपेक्षित, वंचितांच्या जीवनात समृध्दीचा प्रकाश निर्माण करत, सामाजिक न्यायासाठी आयुष्य खर्ची घालून, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी संघर्ष केला आहे. त्यामुळे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना "भारतरत्न" या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानीत करणे इष्ट आहे आणि त्या प्रयोजनार्थ, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर, असा प्रस्ताव, भारत सरकारकडे पाठविणे इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विधानपरिषद नियमांच्या नियम १०६ नुसार, महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

यांना "भारतरत्न" या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानीत करण्याची शिफारस भारत सरकारला करीत आहे.

दहा : **(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ व शुक्रवार दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव —**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून शासनाच्या निष्क्रियतेमुळे गुन्हेगारीला चालना मिळत असणे, महिलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, गँगवॉर, जबरी चोरी, खंडणी, गोळीबाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, सण-उत्सवांमध्ये वाढलेल्या तणावाच्या घटना, जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्यामुळे राज्यातील सामाजिक सौहार्द धोक्यात आले असणे, राज्यात ड्रग माफिया, वाळू माफिया, भू-माफिया, अवैधपणे दारु विक्री करणारे आणि बोगस कंपन्यांमार्फत आर्थिक घोटाळे करणाऱ्या टोळ्यांना अभय मिळणे, बीड मधील मस्साजोगच्या सरपंचाची निर्घृण हत्या, परभणीत संविधान अवमान प्रकरणावरुन दोन गटांत दंगल, पोलीस कोठडीत एकाचा मृत्यू, बदलापूर येथे चिमुकलीवर शाळेतच शिपायाकडून झालेला अत्याचार, आरोपीचा पोलिसांकडून करण्यात आलेला एन्काऊंटर, पुणे येथील स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर झालेला बलात्कार, पुण्यात दिवसाढवळ्या कोयता गँगची दहशत, विशाळगड परिसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी काढलेल्या मोर्चास लागलेल्या हिंसक वळणामुळे झालेले नुकसान, त्यातच लोकप्रतिनिधींचे त्यांच्या कार्यकर्त्यांना गुन्हेगारी करण्यास मिळत असलेले अभय, औरंगजेबाचा कबरीचा वाद निर्माण करुन नागपूर व इतर ठिकाणी दंगल घडवून समाजात तेढ निर्माण करणे, विविध खात्यातील अनियमितता व अनागोंदी कारभार, त्यामुळे अनेक निविदा रद्द करण्याचा घेतलेला निर्णयामुळे शासनाच्या कारभारावर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, यामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये विविध महाविद्यालयांना दिलेली मंजुरी, परिचारकांच्या महाविद्यालयास देताना त्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने सूचविलेल्या महाविद्यालयांव्यतिरिक्त ४०० ते ५०० महाविद्यालयांना त्यासाठी असलेले नियम व निकष

अप्रकाशित

डावलून त्रुटी असलेल्या महाविद्यालयांना नियमबाह्यरित्या मंजूरी देवून केलेला भ्रष्टाचार, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : (मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५, बुधवार, १९ मार्च, २०२५ व गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५, शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) - (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री प्रसाद लाड, विक्रम काळे, सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री कृपाल तुमाने, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी, किशोर दराडे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री किरण सरनाईक, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अमरीशभाई पटेल, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"नागपूर कराराचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन नागपूरसह विदर्भाच्या विकासाला चालना देण्याकरिता विद्यमान शासन कटीबध्द असणे, नागपूर जवळील मिहानमध्ये सेझअंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण झाल्याने बोईंगच्या एमआरओसह अनेक उद्योगांनी नागपूरात येण्यास स्वारस्य दाखविल्याचे निदर्शनास येणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळाचे अद्ययावतीकरण आणि विस्तारीकरण हा नागपूरच्या विकासाचा मैलाचा दगड ठरणार असणे, विस्तारित विमानतळाच्या माध्यमातून ९,००,००० टन क्षमतेच्या कार्गोची हाताळणी होणार असणे, परिणामी, नागपूर विमानतळ मध्य भारतातील गेम चेंजर म्हणून सिध्द होणार असणे, नवीन विमानतळ ३,००,००० स्क्वे. फूट क्षेत्रात बांधले जाणार असल्याने व सध्याच्या धावपट्टीच्या शेजारी आणखी ६० मीटर रुंद आणि ४ हजार मीटर लांबीची धावपट्टी बांधण्यात येणार असल्याने तेथे एकाच वेळी १०० विमाने उभी राहण्याचे प्रयोजन असणे, मोठ्या औद्योगिक टाऊनशीपला लागून असलेले कार्गो हब आणि मोठे विमानतळ ही रचना विदर्भातील भविष्याच्या विकासाचे द्योतक ठरणार असणे, विमानतळाच्या विस्तारामुळे येथून होणाऱ्या माल वाहतुकीची क्षमता वाढल्याने विदर्भातील सर्व उत्पादनांची निर्यात होण्यास गती मिळणार असणे व त्यामुळे सुमारे १ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार असणे, रस्ते, रेल्वे, विमानतळ विकास यामुळे विदर्भ लॉजिस्टीक हब म्हणून विकसित होणार असणे, माहे जानेवारी, २०२५ मध्ये

दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये, ६३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये इतक्या गुंतवणूकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्याने महाराष्ट्र हे थेट परकीय गुंतवणूकीसाठी पसंतीचे राज्य असल्याचे स्पष्ट झाले असणे, देशातील एकूण थेट परकीय गुंतवणूकीच्या २९टक्के गुंतवणूक राज्यात आली असणे, परिणामी, राज्यात १५ लाखांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, राज्य शासन आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यात सुमारे ५ हजार कोटी रुपये गुंतवणूकीचा सामंजस्य करार करण्यात आल्याने ४० हजार रोजगारांची निर्मिती होणे अपेक्षित असणे, मुंबई महानगर विकास प्राधिकरणातील विकास केंद्राबाबत कैलिफोर्नियातील बर्कले युनिव्हर्सिटी समवेत सामंजस्य करार करण्यात येणे, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्याबाबतीत महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य ठरले असणे, राज्यात मुंबई, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे जी-२० च्या विविध बैठका यशस्वीरित्या आयोजित करण्यात आल्या असणे, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील विविध उद्योगांना सुमारे ६ हजार कोटी रुपये इतके गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान वितरित करण्यात येणार असणे, राज्यातील औद्योगिकीकरणाला पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुमारे ३,५०० एकर इतके औद्योगिक भूखंड वितरित करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाची व्यवसाय परिसंस्था निर्माण करण्यासाठी १० एकात्मिक औद्योगिक केंद्रे व एकात्मिक माल वाहतूक केंद्रे विकसित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये, बेरोजगार युवकांना उद्योगांशी जोडण्यासाठी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी राज्यात जिल्हा स्तरावर ६११ 'पंडीत दीनदयाल रोजगार मेळावे' आयोजित केले असणे, त्यायोगे १९ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झाल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील जनतेचे आरोग्य सदृढ ठेऊन प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम् सुखसंपदा' उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने 'महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना' व 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' या एकत्रित योजनेंतर्गत लाखो रुग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या असणे, राज्यात ३० वर्षांवरील सर्व महिलांचे कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान, नाक, घसा व इतर आजारांचे निदान व उपचार याकरिता राज्य शासनातर्फे प्रति जिल्हा २ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असणे, राज्यात शुन्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुलां-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरुक पालक, सदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात येणे, राज्यात ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्रत्येक छोट्या आजारासाठी हॉस्पीटलमध्ये जाऊ लागू नये याकरिता 'हिंदू हृदयसम्राट

बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ७०० दवाखाने सुरु करण्यात येणे, राज्यात विविध महापालिका व जिल्हा परिषदेतील औषधे, वैद्यकीय उपकरणे खरेदीतील अनियमिततेला पायबंद घालण्यासाठी "महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यातील रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ. पायाभुत सुविधा विकास क्षेत्रांसाठी निधी उभारणे आणि प्रकल्प राबविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली 'महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ' स्थापन करण्यात येणे, सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील कामे या महामंडळामार्फत करण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नागपूर येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीची इमारत, नागपूर जिल्हा न्यायालयाची विस्तारित इमारत, मुंबईतील माझगाव न्यायालयाची इमारत, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत, जलभूषण बंगला, राजभवन इ. इमारतींचे बांधकाम अलीकडेच पूर्ण करण्यात येणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (PMIS) ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करण्यासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, नाबार्ड-२८ अंतर्गत १,०३०.५२ कोटी रुपयांच्या ३८२ कामांना नाबार्ड करून मंजुरी प्राप्त झाली असणे व राज्य शासनाने देखील त्यास प्रशासकीय मान्यता दिली असणे, सर्व समाज घटकांना सोबत घेऊन, सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**बारा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१)** **श्रीमती उमा खापरे**, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"नवी मुंबईतील तळोजा येथील ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीतील १७५ कामगारांनी २४ वर्षे इतकी प्रदिर्घ सेवा दिल्यानंतरही त्यांना सेवानिवृत्ती नंतरही अद्याप पर्यंत नऊ कोटी रुपयांची कामगारांची देणी थकित असणे, कामगारांनी अनेक वेळा मागणी केली असता प्रशासन आणि शासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना होत नसणे, त्यामुळे कामगारांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला असणे, यामध्ये आतापर्यंत ३१ कामगारांचे वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या कुटुंबियांना कोणतीही मदत मिळाली नसल्याने हे कुटुंबीय त्यांच्या हक्काचा आर्थिक मोबदला

अस्वीकृत प्रत

मिळण्यापासून वंचित असणे, कंत्राटी कामगार ३२५ व कायम कामगार १७५ असे एकूण ५०० कामगार न्याय मागत असताना त्यांना ८ कोटी ८६ लाख रुपये नियमानुसार मंजूर होऊनही कंपनीने दिले नसल्याने या कामगारांवर उपासमारीची वेळ आलेली असणे, सदर कंपनीची अनेक ठिकाणी मालमत्ता असून ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड या कंपनीमधून १७५ कायम कामगारांपैकी ७१ कामगारांचा तणावाखाली मृत्यू झाला असणे, उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने या कंपनीच्या मालमत्तांचे लिलाव करण्याचे आदेश दिले असतानाही त्याकडे शासन दुर्लक्ष करित असल्याने या कामगार व त्यांच्या कुटुंबियांवर मोठा अन्याय होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री अंबादास दानवे,** सचिन अहिर, सुनिल शिंदे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"आमदार निवास मुंबई तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांमध्ये सन १९८६-८७ या कालावधीत रुजू झालेल्या एकूण ३८ लिपीक टंकलेखक पदावरील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही सलग सेवा व वेतन फरकाची रक्कम त्वरित देण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ रिट पिटीशन क्रमांक २२/२०१९, दिनांक ३ फेब्रुवारी, २०२० अन्वये शासनाला आदेश दिलेले असणे, सदर निवृत्त कर्मचाऱ्यांना सलग सेवा व सन १९८६ ते सन २००३ या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम आजमितीस देण्यात आलेली नसणे, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक आयबीएन/ २००७/ प्र.क्र.५७/ सेवा-५, दिनांक २४ मार्च, २००९ अन्वये वरिष्ठ पद मिळण्याबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दाखल केलेली अवमान याचिका क्रमांक १३५/२००८ अन्वये नागपूर सार्वजनिक बांधकाम विभागातील ३४ कर्मचाऱ्यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. रुअआ-१५९६/ २२८/सेवा-५, दिनांक २४ एप्रिल, २००१ नुसार पदानुसार वेतनश्रेणी रुपांतरित केल्याच्या दिनांकापासून देण्यात येणे, याच धर्तीवर आमदार निवास मुंबई तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामधील वरील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रुपांतरित केल्याच्या दिनांकापासून पदानुसार वेतनश्रेणी व फरकाची रक्कम देण्याची गरज, सदर वस्तुस्थिती विचारात घेता रिट पिटीशन २२/२०१९ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२० रोजी शासनाला आदेश देऊनही निवृत्त कर्मचाऱ्यांना सलग सेवा व वेतन फरकाची रक्कम देण्यास होत असलेला विलंब, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करुन जाणीवपुर्वक विलंब करणाऱ्या अधिकारी व

अस्वाक्षरित प्रत

कर्मचारी यांचेवर कारवाई करुन निवृत्त कर्मचाऱ्यांना सलग सेवा व वेतन फरकाची रक्कम विनाविलंब अदा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २१ मार्च, २०२५.

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

अप्रुधारित प्रत